॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Fax : (02462) 215572** | **Public Relations Office (PRO)** | **website: srtmun.ac.in**

**Phone: (02462) 215325** | **जनसंपर्क कार्यालय** | **E-mail: pro@srtmun.ac.in**

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/२१९ दि.१२/११/२०२४

## इंद्रधनुष्य युवक महोत्सवात 'स्वारातीम' विद्यापीठाला नाट्य विभागाची चॅम्पियनशिप

### ३ गोल्ड व २ सिल्व्हर मेडलसह रचला इतिहास



डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे दि. ७ ते ११ नोव्हेंबर दरम्यान संपन्न झालेल्या राज्यस्तरीय 'इंद्रधनुष्य' युवक महोत्सवामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांच्या नेतृत्वात सहभागी झालेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी कलावंतांनी नृत्य, नाट्य, संगीत, वांग्मय व ललितकला विभागाअंतर्गत विविध कला प्रकारात दमदार सादरीकरण करून नैपुण्य मिळवले आहे. दोन गोल्ड मेडल व तीन सिल्वर मेडल सह या राज्यस्तरीय युवक महोत्सवात नाट्य विभागाची मानाची चॅम्पियनशिप (सर्वसाधारण विजेतेपद) मिळवून इतिहास रचला आहे.

गतवर्षीच्या 'इंद्रधनुष्य' राज्यस्तरीय युवक महोत्सवात विद्यापीठाने 'लोक आदिवासी' नृत्यामध्ये चॅम्पियनशिप मिळवली होती. उज्वल यशाची परंपरा कायम राखत विद्यापीठाच्या संघाने यावेळी देखील विविध कला प्रकारात नैपुण्य दाखवत नाट्य विभागाच्या चॅम्पियनशिपच्या रूपाने विद्यापीठाच्या इतिहासात मानाचा तुरा खोवला आहे.

१. विडंबन- (प्रथम) रोहन गायकवाड, आरती सांगवे, आर्यन गिरवलकर, २. व्यंगचित्रकला- (प्रथम) संजय भराडे, ३. कोलाज- (प्रथम) प्रतीक्षा हळदे, ४. शास्त्रीय तालवाद्य- (द्वितीय) मुंजाजी शिंदे, ५. मिमिक्री- (द्वितीय) अर्जुन पवार या विद्यार्थी कलावंतांनीघवघवीत यश संपादित केले.

या यशाबद्दल संघातील सर्व विद्यार्थ्यांचे, संघ व्यवस्थापक, प्रशिक्षक व विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांचे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, नरेंद्रदादा चव्हाण, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. सूर्यकांत जोगदंड, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, इंजि. नारायण चौधरी, डॉ. संतराम मुंढे, डॉ. हनमंत कंधारकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी मोहम्मद शकील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, विशेष कार्यासन अधिकारी डॉ. दिगंबर नेटके, रासेयो चे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, प्राचार्य डॉ. मा.मा. जाधव, सहा. कुलसचिव रामदास पेदेवाड आदींनी कौतुक करून अभिनंदन केले आहे.

या महोत्सवासाठी प्रशिक्षक म्हणून डॉ. संदीप काळे, डॉ. शिवराज शिंदे, सिद्धार्थ नागठाणकर, नवलाजी जाधव, दिलीप डोंबे, विजय मस्के, डॉ. पांडुरंग पांचाळ, सचिन गोने व संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. साईनाथ उमाटे, प्रा. माधुरी पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

विद्यार्थी विकास विभागाचे कार्यालयीन कर्मचारी संभा कांबळे, बालाजी शिंदे, जीवन बारसे, वाहन चालक रामराव पतंगे, शैलेश कांबळे, गजानन कऱ्हाळे आदींनी संघासाठी परिश्रम घेतले.

---